नागपूर
महासागर
# वृत्तसागर
■ मंगळवार, दि. १५, एप्रिल २०२५ ■

## घरात घुसून तरुणीवर अत्याचाराचा प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**

एका नराधमाने घरात घुसून तरुणीवर जबरीने लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केला. अश्लील चाळे करून विनयभंग केला. ही संतापदायक घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी 22 वर्षीय पीडितेच्या तक्रारीवरून आरोपी तरुणाविरुद्ध गुन्हा नोंदवत त्याला अटक केली आहे. अमोल सुधाकर कडसुले (36) रा. पारडी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

पीडित तरुणी खासगी संस्थेत कामाला आहे. रविवारी रात्री ती आपल्या घरी झोपली होती. या दरम्यान अमोल तिच्या घरात घुसला. अश्लील चाळे करीत तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. पीडितेने त्याला विरोध करीत मदतीसाठी आरडा-ओरड केली असता अमोलने तेथून पळ काढला. पीडितेने घटनेची माहिती पोलिसांना दिली.

पारडी ठाण्याचे एपीआय शिवाजी काठे पथकासह घटनास्थळी पोहोचले. पीडितेचा जबाब नोंदवून अमोलविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून त्याला अटक केली. पोलिसांनी त्याला न्यायालयापुढे हजर केले असता त्याची न्यायालयीन कोठडीत तुरूंगात रवानगी करण्यात आली. अमोल बऱ्याच दिवसांपासून पीडितेला त्रास देत असल्याची माहिती मिळाली आहे.

## संविधान चौकात निशुल्क संविधानाच्या प्रतीचे वितरण

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी आज देशभरात मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नागपुरातील संविधान चौक आणि दीक्षाभूमीवर अनुयायांनी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी केली. तसेच काही ठिकाणी फटाक्यांची आतेषबाजी, मिरवणुकांचेही आयोजन करत भीम जन्मोत्सवाचा जल्लोष केला आहे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज जयंती असून नागपुरात मध्यरात्रीपासूनच मोठ्या उत्साहात अनुयायी महामानवाला वंदन करण्यासाठी रस्त्यावर उतरल्याचे बघायला मिळाले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नागपूरच्या संविधान चौकावर दरवर्षी प्रमाणे यंदाही मध्यरात्री मोठी गर्दी उसळल्याचे बघायला मिळाले. मध्य रात्री केक कापून आणि आतषबाजी करून जन्मोत्सावाला प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर सकाळी दीक्षाभूमी आणि संविधान चौकात बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि विविध सामाजिक संघटनांनी संविधान चौकातील बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. समता सैनिक दलातर्फे संविधान चौकात संविधानाच्या प्रतिचे निशुल्क वितरण करण्यात आले.




शहरातील अनेक भागातून रॅली आणि मिरवणूक काढत भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे.

यावेळी फटाक्यांची ही अतिषबाजी करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने भीम अनुयायी रस्त्यावर उतरून जल्लोष करताना दिसून आले आहे.

डॉ. बाबासाहेबांची जयंती जगभरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. १८९१साली या दिवशी बाबासाहेबांचा जन्म झाला. आंबेडकर जयंती समता दिवस म्हणूनही ओळखली जाते, कारण बाबासाहेबांनी आयुष्यभर समानतेसाठी लढा दिला तसेच कायद्याच्या दृष्टीने सर्व भारतीय नागरिकांना न्याय देण्यावर भर दिला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नागपूरच्या संविधान चौकावर दरवर्षी प्रमाणे यंदाही मध्यरात्री मोठी गर्दी उसळल्याचे बघायला मिळाले.

समता सैनिक दलातर्फे संविधान चौकात संविधानाच्या प्रतिचे निशुल्क वितरण करण्यात आले. येथे काही संस्थांनी बूक स्टॉल लावले होते. तर काहींनी सांस्कृतिक कार्यक्रम, बौद्ध आणि भीम गीताचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. काही संघटनांनी शरबत आणि ज्यूस वितरण केले. विविध बँकांचे माहिती देणारे स्टॉल लावण्यात आले. काही संघटनांनी कडून आरोग्य तपासणी देखील करण्यात येत होती.

बिहारच्या बुद्धगया येथील महाबोधी महाविहारचे व्यवस्थापन बौद्ध बांधवांच्या स्वाधीन करण्याच्या मागणीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बिहाराचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांना हजारो पोस्ट कार्ड पाठवण्यात येत आहेत. या पोस्ट कार्डवर येथे स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली.

### उमरेड एमआयडीसीतील स्फोट
## तीन अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**

नागपूर जिल्ह्यातील उमरेड एमआयडीसीत स्थित एमएमपी कंपनीमध्ये झालेल्या स्फोटाप्रकरणी तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जनरल मॅनेजर तेन्नेटी नरसिंग मूर्ती (५६), सुरक्षा अधिकारी रमण रामचंद्र भाजीपाले (५०) आणि शिफ्ट मॅनेजर अमित शंकरराव बचाले (३८) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

११ एप्रिल रोजी ॲल्युमिनियम फॉइल आणि पावडर तयार करणाऱ्या या कंपनीत स्फोट झाला. या दुर्घटनेत तीन कामगार जागीच ठार झाले. आठ कामगार गंभीर जखमी झाल्याने त्यांना नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालयाच्या तपासणीत कंपनी ॲक्टच्या कलम ७(ए), ४० व ३८ अंतर्गत नियमांचे उल्लंघन आढळून आले. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मृत कामगारांच्या कुटुंबियांना ६० लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. यात शासनाकडून ५ लाख आणि कंपनीकडून ५५ लाख रुपयांचा समावेश आहे. जखमी कामगारांच्या कुटुंबियांना ३० लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे. दुर्घटनेत पियुष दुर्गे, सचिन पुरुषोत्तम मसराम, निखिल शेंडे, अभिलाष जंजाळ आणि निखिल नेहारे यांचा मृत्यू झाला. मनीष वाघ, करण शेंडे, नवनीत कुमरे, पियुष टेकाम, करण बावणे आणि कमलेश ठाकरे हे जखमी झाले. मृतक आणि जखमी कामगार उमरेड आणि भिवापूर तालुक्यातील रहिवासी आहेत. कंपनीने मृत आणि जखमी कामगारांच्या कुटुंबातील प्रत्येकी एका व्यक्तीला नोकरी देण्याचे आश्वासन दिले आहे.

## उभ्या ट्रकवर धडकून इसमाचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**

निष्काळजीपणे अंधारात उभा करून ठेवलेल्या ट्रकवर धडकून एका मोटारसायकलस्वार व्यक्तीचा मृत्यू झाला, तर त्यांचा मित्र गंभीर जखमी आहे. ही घटना गिट्टीखदान पोलिस ठाण्यांतर्गत गोरेवाडा प्राणी संग्रहालयासमोर घडली. रवींद्र शांताराम भोयर (50) रा. गोरले लेआऊट, त्रिमूर्तीनगर असे मृताचे नाव आहे. जखमी दत्तू नत्थू पडवे (55) रा. द्रोणाचार्यनगर यांच्यावर उपचार सुरू आहेत.

रवींद्र यांच्या कुटुंबाची कळमेश्वर येथे शेती आहे. दत्तू यांचे त्रिमूर्तीनगरात सलून आहे. रविवारी दुपारी रवींद्र यांनी दत्तू यांना गहू आणण्यासाठी गावला सोबत येण्याबाबत विचारले.

दत्तने होकार दिल्याने दोघेही कळमेश्वरला गेले. तेथे भावाची भेट आणि परिचितांशी बोलल्यानंतर रात्री 9.30 वाजताच्या सुमारास दोघेही एमएच-31/ईटी-6886 क्रमांकाच्या मोटारसायकलने घराकडे निघाले. गोरेवाडा प्राणी संग्रहालयासमोर ट्रक क्र. एमएच-31/डीएस-8729 च्या चालकाने आपले वाहन रस्त्यावरच निष्काळजीपणे उभे केले होते. रस्त्यावर अंधार असतानाही त्याने टेल लाईट लावलेला नव्हता. ट्रकला रिफ्लेक्टरही नव्हते. त्यामुळे रवींद्र यांना अंधारात उभा ट्रक दिसला नाही आणि त्यांची मोटारसायकल मागच्या भागावर जाऊन धडकली. दोघेही वाहनासह खाली पडून जखमी झाले. रवींद्र यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती.

रस्त्याने ये-जा करणारे लोक मदतीला धावले. दोघांनाही उपचारार्थ मेयो रुग्णालयात रवाना करण्यात आले. घटनेची माहिती पोलिसांनाही देण्यात आली. उपचारादरम्यान रवींद्र यांचा मृत्यू झाला. गिट्टीखदान पोलिसांनी दत्तू यांच्या तक्रारीवरून आरोपी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## महावितरणकडून माहिती अधिकारात टाळाटाळ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**

नागपुरात सध्या प्रीपेड इलेक्ट्रिक मीटर बसवण्याची मोहीम सुरू आहे. या संदर्भात माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी महत्त्वपूर्ण माहिती मागितली होती. मात्र, महावितरणने ही माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे.

कोलारकर यांनी मीटर बसवणाऱ्या एजन्सीचे नाव, कामाचे स्वरूप, मीटर बदलण्याची कार्यपद्धती आणि इतर संबंधित माहिती मागितली होती. त्यांनी ग्राहकांना पूर्वसूचना न देता मीटर बदलण्याच्या अधिकाराबाबतची कागदपत्रेही मागितली होती. एजन्सीच्या कर्मचाऱ्यांना दिलेली ओळखपत्रे आणि त्याबाबतचे नियम यांचीही माहिती त्यांनी मागितली होती. महावितरणने मागितलेली माहिती न देता केवळ तीन ओळींचे एक पत्र पाठवले. त्यासोबत न मागितलेल्या लेटर ऑफ अवॉर्डची काही पाने जोडली. हे पत्र मेसर्स मोंटेकार्लो लिमिटेड, अहमदाबाद यांना ७ ऑगस्ट २०२३ रोजी पाठवले होते. १०६४ पृष्ठांपैकी केवळ १६५ ते १८३ या पानांच्या प्रती जोडल्या.

## बनावट शालार्थ आयडी घोटाळा उघड

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**

नागपूर शिक्षण विभागात मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. बनावट शालार्थ आयडीच्या माध्यमातून अपात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नोकरीत घेऊन शासनाची कोट्यवधींची फसवणूक करण्यात आली आहे.

या प्रकरणी नागपूर विभागाचे शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांना गडचिरोलीत अटक करण्यात आली. त्याचबरोबर वेतन व भविष्य निर्वाह अधीक्षक नीलेश वाघमारे यांनाही ताब्यात घेण्यात आले. शिक्षण उपसंचालक कार्यालयातील माध्यमिक शिक्षण विभागाचे



अधीक्षक नीलेश मेश्राम, शिक्षण उपनिरीक्षक संजय दुधाळकर आणि वरिष्ठ लिपिक सुरज नाईक या तिघांनाही अटक करण्यात आली आहे.

२०१९ पासून नागपूर जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये बोगस प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. सुमारे ५८० बोगस कर्मचाऱ्यांच्या नावे वेतन काढून शासनाची फसवणूक करण्यात आली. शालार्थ पोर्टलवरील त्रुटींच्या तपासणीत हा प्रकार उघडकीस आला.

उल्हास नरड यांच्यावर कोणताही अनुभव नसलेल्या व्यक्तींना बनावट कागदपत्रांच्या आधारे मुख्याध्यापक पदाची मंजुरी देण्याचा आरोप आहे. सर्व आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ व ४७२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिक्षण उपसचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालानंतर ही कारवाई करण्यात आली. या घोटाळ्यात अनेक वरिष्ठ अधिकारी गुंतले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## व्यवसायिक नाटकांचे तंत्र वैदर्भीयांना जमत नाही : डॉ. रवींद्र शोभणे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**

नागपूर व विदर्भात व्यावसायिक रंगभूमी उभी करण्याचे प्रयत्न अनेकांकडून झाले पण काहींना यश आले तर काही अपयशी ठरले. यामधील कारण म्हणजे वैदर्भीय रंगभूमीवर असणारा नाट्यलेखकांचा तुटवडा सोबतच व्यवसायिक नाटकांचे शास्त्रशुद्ध तंत्र वैदर्भीयांना न जमणे हे होय. असे प्रतिपादन अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष रवींद्र शोभणे यांनी व्यक्त केले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नागपूर शाखा वर्धापन दिन व पुरस्कार वितरण सोहळ्याचे. हा सोहळा बाबूराव धनवटे सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता व मंचावर श्रीमंत राजे मधोजी भोसले, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबईचे उपक्रम उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नागपूर शाखेचे अध्यक्ष अजय पाटील व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे



केंद्रीय उपाध्यक्ष आणि नागपूर शाखेचे प्रमुख कार्यवाह नरेश गडेकर, अभिनेते देवेंद्र दोडके, संजय राहटे उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही मराठी रंगभूमीवर आपले विशेष योगदान देणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील व व विदभार्तील कर्तृत्ववान, यशस्वी रंगकर्मींचा सन्मान यावेळी डॉ. रवींद्र शोभने व श्रीमंत मुधोजी भोसले यांच्या हस्ते करण्यात आला.

संपूर्ण हयात रंगमंचावर घालविणारे ज्येष्ठ दिग्दर्शक आणि अभिनेते प्रभाकर आंबोणे यांना यावर्षीचा जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. अनेक वर्षांपासून रंगभूमीशी नाळ जोडून असलेले व्यवसायिक, नाटक, मालिका व चित्रपटात विविध भूमिका साकारणारे ज्येष्ठ अभिनेते व दिग्दर्शक किशोर आयलवार यांना ज्येष्ठ रंगकरमु पुरस्कार प्रदान करण्यात आला. बालपणापासून रंगभूमीची अविरत सेवा करणारी अभिनेत्री सीमा गोडबोले यांना श्रेष्ठ रंगकर्मी पुरस्कार, बालनाट्य हौशी रंगभूमीवर लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेता म्हणून कार्य करणारे रोशन नंदवंशी यांना रंगसेवा पुरस्कार, अनेक वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असणारे राजकुमार मुसणे यांना नाट्य समीक्षा पुरस्कार, सर्वोत्कृष्ट नाट्य लेखकाचा पुरस्कार चंद्रकांत चौधरी यांना तसेच सुनील तीतरे सर्वोत्कृष्ट रंगकर्मी रंगधर्मी पुरस्कार, ज्येष्ठ झाडीपट्टी रंगभूमी वरील ज्येष्ठ अभिनेत्री रागिनी बिडकर यांना झाडीपट्टी रंगभूमी ज्येष्ठ रंग करणे पुरस्कार देण्यात आला. झाडीपट्टीच्या रंगभूमीवर गीतकार गायक व अभिनेता म्हणून आघाडीचे नाव असलेले संतोष वरपल्लीवार यांना झाडीपट्टी रंगभूमी श्रेष्ठ रंगकर्मी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा 2024 25 मध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलावंतांना सन्मानित करण्यात आले. यामध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्री भावना चौधरी, सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना प्रणाम कोर, सर्वोत्कृष्ट अभिनेता आणि दिग्दर्शक यशवंत चोपडे, सर्वोत्कृष्ट नेपथ्य असिधारा लांजेवार, यांना तसेच हिंदी राज्य नाट्य स्पर्धा अंतिम फेरीत पुरस्कार प्राप्त पुण्यशील लांबट, रश्मी लांडे, रोशनी सेलोकार, साक्षी नायगावकर, अक्षय गुल्हाने, मनीषा चौधरी आणि बालनाट्य स्पर्धा अंतिम फेरीत रौप्य पदक प्राप्त व्यंकटेश माकडे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी रवींद्र शोभणे पुढे म्हणाले की वैदर्भीय किंवा नागपूरचे कलाकार, लेखक, दिग्दर्शक, नेपथ्यकार हे कुठल्याच बाबतीत कमी नसून त्यांना व्यवसायिक दृष्टी व तसे वातावरण मिळत नसल्याने ते तुलनेने मागे पडले आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबईचे उपक्रम उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर यावेळी म्हणाले की नाटक हे महाराष्ट्राचे वेड आहे. हे वेड कधीच मरू शकत नाही. याला संजीवनी देण्याचे कार्य अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद व विविध संघटना करीत आहेत. आमचा पुढचा प्रयत्न म्हणजे बालनाट्य चळवळीला कार्यान्वित करून त्याला विकसित करण्याचे आमचे ध्येय आहे. यावेळी श्रीमंत राजे मुधोजी भोसले म्हणाले की कलाकारांना राजाश्रय मिळणे आवश्यक आहे आणि नाट्य क्षेत्रात व इतर क्षेत्रातील कलाकाराला जर माझ्याकडून काही मदत हवी असेल असेल तर मी तत्पर आहे.

यावेळी प्रभाकर आंबोणे सत्काराला उत्तर देताना म्हणाले की नाटक ही सांघिक कलाकृती आहे. ही कलाकृती एकट्याने पूर्ण होऊच शकत नाही. त्यामुळे आजचा सत्कार मी नाट्य क्षेत्राशी जोडलेल्या प्रत्येक रंगकमीर्ला प्रदान करतो. कोणत्याही कामाला स्वतःचे शंभर टक्के दिले तर आपण नक्कीच नावलौकिका येतो पण आजचा हा पुरस्कार माझ्या घरचा पुरस्कार असल्याने मला विशेष आनंद आहे. यावेळी आपल्या प्रवासात आपल्या पत्नीचे विशेष योगदान असल्याचेही ते बोलले. कार्यक्रमाची प्रस्तावना अजय पाटील यांनी केले तर कार्यक्रमाला नाट्य व साहित्य क्षेत्रातील दिग्गज उपस्थित होते.

## आकारनगरात १.२३ लाखांची घरफोडी

**नागपूर :** गिट्टिखदानच्या आकारनगरात अज्ञात आरोपीने घरफोडी करीत रोकड आणि दागिन्यांसह एकूण 1 लाख 23 हजार रुपयांच्या मालावर हातसाफ केला. या प्रकरणी पोलिसांनी मिनल रवींद्र टाले (36) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत 11 एप्रिल रोजी मिनल घराला कुलूप लावून भाच्याच्या वाढदिवसासाठी बाहेर गेल्या होत्या. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. प्लॅस्टिकच्या ड्रममध्ये कपड्यांखाली ठेवलेली 85 हजारांची रोकड आणि सोन्याचे दागिने असा अंदाजे 1.23 लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. दुसऱ्या दिवशी सायंकाळी मिनल घरी परतल्या असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.







नागपूर : भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उपराजधानीत उत्साह ओसंडून वाहत होता . शहराच्या सर्व भागातून मिरवणुका काढण्यात आल्या. त्यात बाबासाहेबांच्या जीवनातील अनेक प्रसंग साकारण्यात आले होते. शहरातील संविधान चौकात सकाळपासूनच अभिवादन करण्यासाठी अनुयायांची प्रचंड गर्दी उसळली होती . दीक्षाभूमीवर लाखोच्या संख्येने नागरिकांनी आदरांजली अर्पण केली. यावेळी बाबासाहेबांची प्रतिमा सोबत घेत तरूणाईने लक्ष वेधून घेतले .

